**ठळक बातम्या**

- जगातल्या सर्वात उंच कमानीवरच्या पुलाचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन/ जम्मू काश्मीरमधे ४६ हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध प्रकल्पांचं केलं लोकार्पण

- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरण आढाव्यात रेपो दरात अर्धा टक्के कपात

- मणिपूरमधे ८ सशस्त्र अतिरेक्यांना अटक

**आणि**

- भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर रवाना

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जम्मू-काश्मीर दौऱ्यात जगातला सर्वात उंच रेल्वे पूल असलेल्या चिनाब पुलाचं उद्घाटन केलं. तत्पूर्वी त्यांनी संपूर्ण पुलाची पाहणी केली. तसंच त्यांनी उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे लिंक आणि चिनाब पूल निर्मितीत सहभागी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. चिनाब नदीपासून ३५९ मीटर उंचीवर असलेला रेल्वे पूल हा जगातला सर्वात उंच रेल्वे कमानीवरचा पूल आहे. एक हजार ३१५ मीटर लांबीचा हा पूल स्टीलपासून तयार केला आहे. देशातला सर्वात उंचावरचा केबलवरचा पूल असलेल्या अंजी पुलाचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं.

प्रधानमंत्र्यांनी कटरा इथं श्री माता वैष्णोदेवी-श्रीनगर वंदे भारत गाडीला हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर त्यांनी शालेय विद्यार्थ्यांबरोबर गाडीने प्रवास केला. या ठिकाणी होणाऱ्या जाहीर कार्यक्रमात ४६ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्घाटन आणि राष्ट्रार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येत आहे.

**<><><><><>**

देशातल्या युवकांनी जागतिक स्तरावर आपला ठसा निर्माण केला असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. एनडीए सरकारनं ११ वर्षात युवकांसाठी विविध क्षेत्रांमध्ये स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया, डिजिटल इंडिया आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० यांसारख्या अनेक योजना राबवल्या असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

रालोआ सरकारनं  गेल्या ११ वर्षात विविध उपाययोजनांमार्फत तरुण पिढीला सक्षम बनवण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे.  घेऊ या संक्षिप्त आढावा

**होल्ड - व्हॉईस कास्ट**

*भारतात जगातला सर्वात तरुण देश आहे. म्हणजे देशाच्या एकूम लोकसंख्येत युवकांचा मोठा वाटा आहे. सुमारे ६५ टक्के  लोकांचं वय ३५ वर्षांपेक्षा कमी आहे.  या युवा वर्गाला गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक कौशल्ये, चांगल्या नोकऱ्या मिळाव्यात तसंच त्यांना यशस्वी उद्योजक बनण्यासाठी आवश्यक पाठबळ मिळवून देण्यासाठी सरकार काम  करत आहे. रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांना लक्षणीय परिणाम दिसत आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये नोकरीसाठीची अर्हता सुधारली आहे. २०१४ मध्ये हे प्रमाण ३४ टक्के होतं, २०२४ मध्ये ५१ टक्के पेक्षा अधिक आहे. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेद्वारे गेल्या १० वर्षांत १ कोटी ६३ लाखांहून अधिक तरुणांना प्रशिक्षण मिळालं. रोजगाराच्या आघाडीवर, २०२२ मध्ये सुरू झालेल्या रोजगार मेळ्याद्वारे १५ राष्ट्रीय कार्यक्रमांतून सुमारे १० लाख नियुक्ती पत्रं वाटण्यात आली आहेत. दरम्यान, २०१७ पासून कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीच्या सदस्यांची संख्या साडेआठ कोटींहून अधिक झाली आहे. २०२० पासून ३ कोटी ४५ लाख तरुणांचा समावेश आहे.  मुद्रा योजनेमधून लहान व्यवसायांना सुलभ कर्जासह पाठिंबा मिळाला आहे. या अंतर्गत, ३३ लाख कोटी रुपयांची ६ कोटी ६७ लाखांहून अधिक कर्जं मंजूर करण्यात आली. २०१६ पासून, स्टार्टअप इंडिया उपक्रमाने १ लाख ५९ हजारांहून अधिक स्टार्टअप्सना मान्यता दिली आहे, परिणामी १६ लाखांहून अधिक थेट नोकऱ्या निर्माण झाल्या. उल्लेखनीय म्हणजे, यापैकी ७३, हजारहून अधिक स्टार्टअप्समध्ये किमान एक महिला संचालक आहे.*

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं आज व्दैमासिक पतधोरण आढावा जाहीर केला. पतधोरण समितीनं रेपो दरात अर्धा टक्के कपात केली आहे. आता रेपो दर साडेपाच टक्के झाला आहे. एसडीएफ दर सव्वापाच टक्के तर बँक दर पावणे सहा टक्के झाला आहे. आर्थिक वर्ष २०२६ साठी महागाई दर ४ टक्क्यांवरून कमी करुन ३ पूर्णांक ७ दशांश टक्यांवर आणण्यात आला आहे तर चालू आर्थिक वर्षासाठी जीडीपी वाढीचा अंदाज साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवण्यात आला

आहे. पतधोरण समितीची पुढील बैठक ४ ते ६ ऑगस्ट २०२५ दरम्यान होणार आहे.

आरबीआयनं व्दैमासिक पतधोरण आढावा जाहीर केल्यानंतर शेअर बाजारात तेजी दिसून आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ६६६ अंकांनी वाढून ८२ हजार १०८ अंकांवर व्यवहार करत आहे तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २२६ अंकांनी वाढून २४ हजार ९७६ अंकांवर व्यवहार करत आहे.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर नंतर भारताने दहशतवादाविरोधातील भूमिका जगासमोर मांडण्यासाठी सर्वपक्षीय शिष्टमंडळं विविध देशांना पाठवले होती. त्यापैकी खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळ जर्मनीत पोहोचलं आहे. ७ जूनपर्यंत हे शिष्टमंडळ जर्मन संसद सदस्य आणि जर्मनीच्या संघीय परराष्ट्र कार्यालयातील वरिष्ठ मान्यवरांशी चर्चा करेल. शिष्टमंडळ जर्मनीतील विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि भारतीय समुदायाच्या प्रमुख प्रतिनिधींशी संवाद साधणार आहे.

**<><><><><>**

सुरक्षा यंत्रणांनी आज मणिपूरमधे ८ सशस्त्र अतिरेक्यांना अटक केली. प्रतिबंधित युनायटेड पीपल्स पार्टी ऑफ कांगलेईपाकचे ३ कार्यकर्ते तसचं प्रतिबंधित पीपल्स लिबेरेशन आर्मी चे ४ कार्यकर्ते इम्फाळ जिल्ह्यातून पकडले गेले. आणखी एकाला बिशनुपूर जिल्ह्यातून पकडण्यात आले.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलांबरोबर काल झालेल्या एका चकमकीत सुधाकर उर्फ नरसिंह चालम उर्फ गौतम हा नक्षलवादी नेता मारला गेला. त्याच्यावर १ कोटी रुपयांचं बक्षीस होतं. तसंच गेल्या तीन दशकांपासून तो महाराष्ट्र, छत्तीसगड आणि

तेलंगणामध्ये नक्षलवादी कारवायांमध्ये सक्रिय होता, असं छत्तीसगढच्या पोलिस महासंचालकांनी सांगितलं.

**<><><><><>**

जम्मू आणि काश्मीरमध्ये, येत्या ३ जुलैपासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेला कडेकोट सुरक्षा प्रदान करण्यासाठी लष्करानं 'ऑपरेशन शिवा' ही व्यापक सुरक्षा मोहीम सुरू केली आहे. २२ एप्रिलला पहलगाम इथं झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर, लष्करानं केंद्रीय सशस्त्र पोलिस दल, जम्मू आणि काश्मीर पोलिस आणि श्री अमरनाथजी श्राइन बोर्ड यांच्या समन्वयाने यात्रेकरूंच्या सुरक्षिततेसाठी कडक उपाययोजना केल्या आहेत.

**<><><><><>**

बेंगळूरू इथल्या चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरीप्रकरणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी बेंगळुरूचे पोलीस आयुक्त बी. दयानंद आणि इतर अनेक वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. तसंच रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू संघ, आयोजक डीएनए एंटरटेनमेंट कंपनी आणि कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनच्या प्रतिनिधींना अटक केली आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर आज रवाना झाला. या दौऱ्यात ५ कसोटी सामने होणार असून ते २०२५-२०२७ च्या आयसीसी जागतिक कसोटी क्रिकेट स्पर्धेचा भाग आहेत. रोहित शर्मा आणि विराट कोहली या दिग्गज क्रिकेटपटूंनी कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केल्यानंतरचा हा भारतीय संघाचा पहिलाच कसोटी दौरा आहे. शुभमन गिल कडे नेतृत्वाची धुरा आहे.

<><><><><>

इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेमध्ये, भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विकसाईराज रांकीरेड्डी या जोडीनं स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी रासमुस केजर आणि फ्रेडरिक सोगार्द या डॅनिश जोडीचा २-१ असा पराभव केला.

<><><><><>

सिक्किममधे अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलनामुळे अडकलेल्या पर्यटकांना सुखरुप सोडवण्याचं काम प्रगतीपथावर आहे. चातेन भागातून १७ पर्यटकांना एम आय टू हेलिकॉप्टरनं पाक्योंगच्या ग्रीनफील्ड विमानतळावर उतरवण्यात आलं. इतर पर्यटकांची सुटका करण्यासाठी हेलिकॉप्टर कार्यरत असून विमानतळावर वैद्यकीय पथक तैनात करण्यात आलं आहे.

<><><><><>

आसाममध्ये पूरस्थिती काहीशी ओसरली असली तरीही अद्याप १६ जिल्ह्यांमध्ये ५ लाख ६० हजारांहून अधिक जण पुरात अडकले आहेत. राज्यातल्या चौदाशे गावांना पुराचा फटका बसला असून सुमारे १ हजार ९०० हेक्टरपेक्षा जास्त शेतजमिनीचं नुकसान झालं आहे.

<><><><><>

आसाम आणि मेघालय मधे तुरळक ठिकाणी आज जोरदार पावसाची शक्यता आहे. ईशान्येकडच्या इतर राज्यांमधे, तसंच केरळ, माहे कर्नाटकचा किनारी भाग आणि पश्चिम बंगाल मधला हिमालयीन प्रदेश इथं येत्या ७ दिवसात मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. आंध्र प्रदेशचा किनारी भाग, रायलसीमा, कर्नाटकाचा आतला भाग,

मध्यप्रदेश, विदर्भ आणि छत्तीसगडमधे उद्यापर्यंत सोसाट्याचे वारे, मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. तमिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलमधे आज वातावरण उष्ण आणि दमट राहील.

**//<><><><><>//**